☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


### ❖ पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली विशेष मोहीमेतंर्गत अवैध दारूविक्रीच्या जिल्हयात एकुण १६ केसेस :-

महाराष्ट्र शासनाचे आदेशान्वये चंद्रपूर जिल्ह्याात दिनांक ०१/०४/२०१५ पासुन दारूबंदी घोषीत करण्यात आलेली असुन पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात विशेष मोहीम राबवुन **दिनांक ०५/१०/२०१७ चे ००:०१ ते २३:५९ वाजता पर्यंत जिल्ह्याात पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर, रामनगर, वरोरा, ब्रम्हपुरी, भिसी, चिमुर, मुल, पाथरी, पोंभुर्णा, राजुरा, गोंडपिंपरी** हद्दीत **एकुण ५,०६,४०१/-रू** ची अवैध दारू जप्त करण्यात आली आहे. पोलीस स्टेशन ला एकुण **१६** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **११** आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

-----------------------------------------------------------------------

### ❖ रोडवर धोकादायक स्थितीत वाहने उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन धारकांवर कार्यवाही :-

**पोलीस स्टेशन दुर्गापुर :-**

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **दुर्गापुर** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन रोडवर मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केल्याने पोलीस स्टेशन **दुर्गापुर** येथे अप.क्र. ३८५/२०१७ कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **दुर्गापुर** पोलीस करीत आहे.

-----------------------------------------------------------------------

**पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी :-**

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **ब्रम्हपुरी** अंतर्गत ०३ आरोपी इसम हे आपआपले ताब्यातील वाहन रोडवर मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केल्याने पोलीस स्टेशन **ब्रम्हपुरी** येथे अप.क्र. ९६५/२०१७, ९६६/२०१७ व ९६७/२०१७ कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील ०३ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **ब्रम्हपुरी** पोलीस करीत आहे.

-----------------------------------------------------------------------

### ❖ प्राशन करून वाहन चालविणाऱ्या मद्यपी वाहन चालकांवर कार्यवाही :-

**पोलीस स्टेशन पडोली:-**

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **पडोली** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **पडोली** येथे अप.क्र. ३८१/२०१७ कलम २७९ भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास **पडोली** पोलीस करीत आहे.

-----------------------------------------------------------------------

**पोलीस स्टेशन चिमुरः-**

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **चिमुर** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **चिमुर** येथे अप.क्र. ५३६/२०१७ कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास **चिमुर** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन मुलः-**

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **मुल** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **मुल** येथे अप.क्र. ८३८/२०१७ कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास **मुल** पोलीस करीत आहे.

---

❖ **प्रतिबंधक कारवाई :-**

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी जिल्ह्याात कलम **१०७** दंड प्रक्रिया संहिता अन्वये **०३**, कलम **११०** दंड प्रक्रिया संहिता अन्वये **०६** असे एकुण **०९** ईसमांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

---

❖ **मोटार वाहन कायदा अन्वये कारवाई :-**

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी जिल्ह्याात मोटार वाहन कायदा अन्वये अवैध प्रवाशी ०१, ओव्हरलोड/ओव्हरसिट १०, रिफलेक्टर/नोपार्किंग ०५, दारू प्राशन अन्वये ०२ इतर केसेस **३६३** असे एकुण **३८१** केसेस करण्यात आल्या आहेत.

---

चंद्रपूर पोलीस

# बुरा मत टाईप करो, बुरा मत लाईक करो, बुरा मत शेअर करो..

वाढत्या आधुनिक जिवन शैलीचे विभाज्य अंग असलेले इंटरनेट त्याद्वारे होणारे गुन्हे यातुन स्वत:ला सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी ही इंटरनेट वापर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची आहे. व त्याकरीता या विषयी जागरूक असणे ही काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे सोशल मिडिया चा वापर सुध्दा मोठया प्रमाणात वाढला असुन त्याचा दुरूपयोग करणारे काही विकृत माणसीकतेचे लोक त्याद्वारे एखादयाची बदनामी करण्यासाठी बदनामीकारक मेसेजेस आणि धार्मिक भावना दुखावणारे मेसेजस पसरवुन समाजात अहिंसा पसरवित आहे.

पोलीस स्टेशन पोभुर्णा येथे दिनांक ०१/०६/२०१७ रोजी तक्रार नोंद झाली की, एका अज्ञात इसमाने पोंभुर्णा येथील एका मुलीचे नाव आणि फोटो वापरून फेसबुकवर खोटे अकाउंट (Fake Account) तयार करून मुलीची बदनामी केली. यावरून अप.क्र. १२६/२०१७ कलम ६६(क), ६७ माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करून तपास करण्यात आला.

चंद्रपुर पोलीस सायबर सेलच्या माध्यमातुन विश्लेषण करून आरोपी निष्पन्न करुन आरोपीविरुध्द सबळ तांत्रीक पुरावा प्राप्त झाला आहे आरोपी हा पोंभुर्णा येथीलच शासकीय नोकरी करणारा व्यक्ती निघाला असुन त्यास अटक करण्यात आली आहे. . पुढिल तपास सुरू आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय कडुन वेळोवेळी सर्व सामान्य लोकांना सोशल मिडियाचा गैरवापर करू नये म्हणुन जागरूकता शिबिरे घेण्यात येतात. तरीपण काही व्यक्ती सोशल मिडियाचा गैर वापर करून आपला भविष्य अंधकारमय करून घेतात. तरी याद्वारे सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की, सोशल मिडियाचा गैरवापर करू नये आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सांगितलेले तिन मंत्रांचे आधुनिक रूपांतर बुरा मत टाईप करो, बुरा मत लाईक करो, बुरा मत शेअर करो...यावर अंमलबजावणी करण्याची निश्चीतच गरज आहे.

---

चंद्रपूर पोलीस

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)


## घरफोडी करणारी आंतरराज्यीय टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात ....

चंद्रपुर जिल्हयात मागील काही काळात विविध पोलीस स्टेशन अंतर्गत दिवसा व रात्रीच्या घरफोडीच्या गुन्हे नोंद असुन यामध्ये सोने चांदीचे दागीने चोरीस गेलेले आहेत. सदर गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. पोलीस अधीक्षक श्रीमती नियति ठाकर आणि अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनात तपास स्थागुशा प्रभारी श्री. सुधाकर अंभोरे यांनी सुरवात केली. तपासादरम्यान गोपनीय माहिती काढली असता, दोन इमस सराफा लाईन चंद्रपुर येथे सोन्याचे दागीने विक्री करण्याच्या उद्दशाने फिरत आहे. अशा माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने दोन्ही इसमास ताब्यात घेवुन विचारपुस करून झडती घेतली असता त्यांचे जवळ तीन सोन्याचे गोप मिळुन आल्याने दोघास ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता दोघांनी जिल्यातील ०८ गुन्हे केल्याची कबुली दिली असुन त्यांची टोळी ही आंतर राज्यीय घरफोडीचे गुन्हे करणारे गुन्हेगार टोळी असून सदर टोळीने कर्नाटक आध्रप्रदेश, ईत्यादी राज्यात मोठया प्रमाणात घरफोडया केल्याचे समजते.

सदर गुन्हेगार टोळीचे आरोपी हे मुळ तामीळनाडु राज्यातील तामरम आणी कल्लुट येथील रहीवासी आहेत. त्यांचे वास्तव जिल्हयातील भद्रावती, पिपरबोडी, गोपालपुरी चंद्रपुर, रैयतवारी कॉलरी चंद्रपुर या ठिकाणी असुन ते नाममात्र स्विपरचे काम करतात आणि लहान मोठया गुन्हे करीत आता टोळयाने जबरी चोरी, घरफोडी, दरोडा या सारखे गंभीर गुन्हे सातत्याने करू लागले आहे. सदर टोळीतील काही गुन्हेगार नंदनवन पोलीस स्टेशन नागपूर येथील खरबी, दिघोरी या भागात वास्तव्यास आहे.

सदर गुन्हेगार हे दिवसा किंवा रात्रीला बंद असलेले घर बघतात व दरवाज्याचा कुलुप कोंडा तोडून आत प्रवेश करतात व सोन्या चांदीचे दागीने चोरून त्यांचे ओळखीचे सोनारास विकतात. सदर गुन्हयातील आरोपी कडुन आणि त्यांनी विक्री केलेल्या सोनाराकडुन एकुण सोन्या चांदींचे दागीने कि. १५,५२,०००/-रू. व बजाज मोटार सायकल कि. अंदा. २०,०००/- रू असा एकुण १५,७२,०००/- रू चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणात दोन आरोपी व दोन सराफा दुकानदार यांना अटक करण्यात आली असुन आरोपी पोलीस कस्टडी रिमांड मध्ये आहे.

***दाखल गुन्हयातील हस्तगत गेलेले सोन्या चांदीचे दागीने व ईतर वस्तु***

| अ.क्र | अप क्र. | आरोपीकडुन हस्तगत करण्यात आलेला मुद्येमाल |
|---|---|---|
| १ | पोस्टे चंद्रपुर शहर<br>६७६/१७ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी | २५.५ तोळे सोन्याची रगड व ८.५तोळे सोन्याचे दागीने एकुण कि. १२,९०,०००/-रू. |
| २ | पोस्टे चंद्रपुर शहर<br>७६५/१७ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी | ६ ग्रम वजनाची सोन्याची नथ<br>एकुण किं. १८,०००/-रू. |
| ३ | पोस्टे चंद्रपुर शहर<br>८७६/१७कलम ४५४,४५७,३८० भादवी | एक ३ ग्रॅम वजनाची सोन्याचे अंगठी<br>किं. ९,०००/-रू. |
| ४ | पोस्टे चंद्रपुर शहर<br>१३१०/१७ कलम ४५४,४५७,३८० भादवी | सोन्याचे २० ग्रॅम वजनाचे डोरले कि.६०,०००/- |
| ५ | पोस्टे रामनगर<br>३०७/१६ कलम ४५४,४५७,३८० भादवी | एक १० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी कि. ३०,०००/-रू. |
| ६ | पोस्टे रामनगर<br>४६४/१७ कलम ३७९ भादवी | एक सोन्याचे मंगळसुत्र वजन अंदाजे १.५ ग्रॅम कि. ४५,०००/-रू. |

| | | |
|---|---|---|
| ७ | पोस्टे रामनगर<br>१२४५/१७ कलम ४५७,३८० भा.द.वी. | चांदीचे दागीने ३६० ग्रॅम  किं.१०,०००/-रू. |
| ८ | पोस्टे रामनगर<br>१३४९/१७ कलम ४५७,३८० भा.द.वी. | ३० ग्रॅम सोन्याची अंगठी ,किं. ९०,०००/-रू. |
| | **एकुण** | **रुपये १५,५२,०००/-रू. चा माल** |

एकुण चोरी गेलेले सोन्याचे दागीने :- ७७१. ५ ग्रॅम (७७. १५ तोळे)
**मिळालेले सोने :- ४३० ग्रॅम ( ४३.५ तोळे)**

एकुण चोरी गेलेले चांदीचे दागीने :- ३६० ग्रॅम (३६ तोळे)
**मिळालेली चांदी :- ३६० ग्रॅम (३६ तोळे)**

सदरची कामगीरी मा. नियती ठाकर ,भापोसे पोलीस अधिक्षक चंद्रपुर व श्री हेमराजसींह राजपुत , मपोसे ,अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर अंभोरे व त्यांचे अधिनस्त पोलीस उपनिरीक्षक श्री. सुनिल व्ही. उईके व पोलीस स्टॉफ सफौ. दौलत चालखुरे, नितीन जाधव, पदमाकर भोयर, पोहवा महेंन्द्र भुजाडे, पोशि प्रांजल झिलपे, कुंदन बावरी यांनी पार पाडली.

सदर आरोपी हे आपले जिल्हयात **पो.स्टे. भिसी** येथे १) अप.क्र. १००/१७ कलम ४५७,३८० भादवी , २) अप.क्र. ५३/१७ कलम ४५७,३८० भादवी, ३) अप.क्र. १२१/१७ कलम ४५७,३८० भादवी , **पो.स्टे.चिमुर** ,४) अप. क्र. २५४/१७ कलम ४५७,३८० भादवी व **पो.स्टे.सिंदेवाही** येथे ५) अप.क्र. १५३/१७ कलम ४५७,३८० भादवी ६) अप.क्र. १९१/१७ कलम ४५७,३८० भादवी व **पो.स्टे. नागभीड** येथे ७) अप.क्र. ८४/१७ कलम ४५७,३८० भादवी गुन्हयांमध्ये फरार आहे.

सदर आंतरराज्य टोळीने चंद्रपुर जिल्हयासह आजु बाजुचे जिल्हयात घरफोडया केल्याची दाट शक्यता असुन त्यादृष्टीने सुध्दा सखोल तपास सुरू आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# चंद्रपुर शहर पोलीस उपविभागातील चोरी आणि घरफोडीचे गुन्हे उघडकीस

## चोरीस गेलेला लाखोचा ऐवज हस्तगत

शास्त्रीनगर चंद्रपुर येथील बाल निरिक्षण गृहातुन वांरवार पळुन जाणारा बालक आणि त्याची टोळी चंद्रपुर जिल्हयात दिवसा आणि रात्रोदरम्यान घरफोडी करीत होते. वारंवार होणाऱ्या घडफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर, रामनगर व दुर्गापुर येथील गुन्हे शोध पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी अंत्यत शिताफिने सापळा रचुन त्या टोळीतील ०३ विधिसंघर्ष बालकांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान तिनही विधिसंघर्ष बालकांना विचारपुस केली असता त्यांनी कबुली दिली की बियाणी पेट्रोलपंपासमोरील परिसरात, सिस्टर कॉलोनी, समाधी वार्ड येथे त्यांनी मोठमोठया घरफोडया केलेल्या आहेत. या गुन्हयातील घरफोडी करून चोरून नेलेला सुमारे २५ तोळे सोने त्यांचेकडुन हस्तगत करण्यात आले आहे.

याबरोबरच चंद्रपुर शहर उपविभागामध्ये १६ घरफोडया आणि जबरी चोरीचे ०५ गुन्हे उघडकीस आणुन त्यामध्ये एकुण ३२ तोळे सोने कि. ६,६०,०००/—रू चा माल हस्तगत करण्यात पोलसांना यश आले आहे.

याचप्रमाणे दुचाकी आणि चारचाकी वाहन चोरीचे गुन्हे उघडकिस आणयासाठी उपविभाग चंद्रपुर येथील पोलसांना यश आले आहे. यामध्ये पोलीस स्टेशन दुर्गापुर अंतर्गत चोरीस गेलेल्या ०५ मोटारसाईकल, चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन अंतर्गत ०९ मोटार साईकल, रामनगर पोस्टे अंतर्गत १३ मोटारसाईकल असे एकुण २७ मोटार साईकल किमंत २,७०,०००/—रू चा माल जप्त करण्यात आला. तसेच पोलीस स्टेशन बल्लारशाह आणि रामनगर येथील दाखल असलेल्या चोरीच्या गुन्हयातील एकुण ०४ ट्रक किं. १२,००,०००/—रू चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

---

चंद्रपूर पोलीस

# हुक्का पार्लर चालविणाऱ्यावर चंद्रपुर शहर गुन्हे शोध पथकाची कार्यवाही

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथील गुन्हे शोध पथकातील अधिकारी कर्मचारी यांना माहिती मिळाली की, श्री टॉकीज चौकातील करण हॉटेलच्या इमारतीमध्ये हुक्का व तंबाखुजन्य पदार्थाचे धुम्रपान चालु आहे. अशी माहिती मिळताच पोलीस पथक तात्काळ मिळालेल्या माहितीप्रमाणे श्री. टॉकीज चौकात पोहचुन हॅाटेल मध्ये छापा टाकला असता तिथे तयार करण्यात आलेल्या वेगवेगळया कॅबीनमध्ये काही इसम हुक्का व तंबाखुजन्य पदार्थाचे धुम्रपान करीत असता मिळुन आले. सर्वांना ताब्यात घेवुन हॅाटेल मालक आणि मॅनेजर यांना विचारपुस केली असता त्यांचे कडे हुक्का आणि तंबाखुजन्य पदार्थ कोणताही परवाना नसल्याने त्यांना अटक करण्यात आली. सदर ठिकाणाहुन हुक्का धुम्रपानाच्या साहित्यासह एकुण १४,१८५/—रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे कलम ४, ७, २० व २१ सिगारेट व तंबाखु उत्पादणे अधिनियम २००३ सहकलम ३३, ३१ मपोका अनव्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही श्री. सुशिलकुमार नायक, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात, श्री. भगत पोलीस निरिक्षक यांचे नेतृत्वात गुन्हे शोध पथकातील पोउपनि श्री. मुंडे, श्री. जिवतोडे, सहायक फौजदार माहुलीकर, पोहवा चौधरी, पाल, केमेकर, नापोशि प्रकाश, किशोर, संजय, पांडुरंग, पोशि जितेंद्र यांनी पार पाडली.

---